साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24



* वर्ष २५ वे * अंक ४४ * सोमवार २८/१०/२०२४ * डाक ३०/१०/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 44 * monday : 28 / 10 / 2024 * post Dt. 30/ 10 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.

आपणास नूतन वर्ष हे
निरोगी, आनंदाचे,
सुखा समाधानाचे, भरभराटीचे जावो!
दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा...!
– संपादक




### दीपावली-२०२४

दि.२८ ऑक्टो.– गोवत्स द्वादशी, बसुबारस
दि.२९ ऑक्टो.– धनत्रयोदशी,
धन्वंतरी जयंती, यमदीपदान
दि.३१ ऑक्टो.– नरक चतुर्दशी, अभ्यंगस्नान
सरदार वल्लभभाई पटेल जयंती
दि.१ नोव्हें.– लक्ष्मीपूजन
(सायं.०६:०४ ते ०८:३५
दि.२ नोव्हें.– बलिप्रतिपदा,
दीपावली पाडवा.
दि.३ नोव्हें.– भाऊबीज (यमद्वितीया)

# नाभीतून आतडे बाहेर आलेल्या शिशुवर यशस्वी उपचार

## शस्त्रक्रियेने वाचविले शिशुचे प्राण; एनआयसीयुचाही सहभाग

*जळगाव – निमखेडी सारोळा येथील नवजात शिशुच्या नाभीतून बाहेर आलेल्या आतडे शस्त्रक्रियेद्वारे पोटात रचण्यात आले. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांच्यासह नवजात शिशु विभागाच्या उपचारामुळे शिशुचे प्राण वाचले.*

*याबाबत माहिती अशी की, मुक्ताईनगर तालुक्यातील निमखेडी सारोळा येथील किसन पवार हे मोलमजूरी करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवितात. त्यांच्या सुखी संसारात मुलाच्या रूपाने फुल उमलले. त्यांच्या पत्नीची मुक्ताईनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती झाल्यानंतर जन्मलेल्या शिशुच्या नाभीतून आतडे बाहेर आले होते. यावेळी स्थानिक डॉक्टरांनी त्यांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. त्यांनी तातडीने डॉ. उल्हास पाटील रूग्णालय गाठले. याठिकाणी किसन पवार यांनी त्यांच्या शिशुला उपचारासाठी भरती केले. बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांनी शिशुची तपासणी करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शिशुवर डॉ. मिलींद जोशी यांनी शस्त्रक्रिया करून बाहेर आलेले आतडे पोटात रचले. शिशुचे वजन कमी असल्याने त्यास नवजात शिशु अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीवार यांनी तातडीने शिशुवर उपचार सुरू केले. सुरवातीचे काही दिवस श्वास घ्यायला त्रास होत असल्याने शिशुला व्हेंटीलेटरवर ठेवून उपचार सुरू ठेवण्यात आले. उपचारामुळे शिशुच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्याला झालेल्या जंतुसंसर्गावर नियंत्रण मिळविण्यात आले. शस्त्रक्रिया आणि उपचारामुळे शिशुची प्रकृती धोक्याबाहेर येऊन त्याचे प्राण वाचले.*

*शिशुचे प्राण वाचल्याने किसन पवार यांच्या कुटूंबातील आनंद हा गगनात मावेनासा झाला. उपचारासाठी बालरोग तज्ज्ञ डॉ. उमाकांत अणेकर, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. कुशल धांडे, हिरामण लांडगे यांनी सहकार्य केले.*



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

# महिलेच्या पोटातून मल्टीपल फायब्रॉइड काढण्यात यश

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञांकडून उपचार

**जळगाव – बोदवड तालुक्यातील एका ४५ वर्षीय महिलेच्या पोटातून मल्टीपल फायब्रॉइड अर्थात तीन गाठी काढण्यात डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञांना यश आले आहे. विशेष म्हणजे महिलेवर बिनटाक्याची शस्त्रक्रिया करण्यात आली.**

बोदवड तालुक्यातील एका ४५ वर्षीय महिलेच्या पोटात गत चार ते पाच महिन्यापासून सतत दुखत होते. त्यांना प्रचंड वेदनाही होत होत्या. काहि दिवसांपासून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्रावही सुरू झाला होता. अशा परिस्थितीत या महिलेच्या कुटूंबियांनी तीला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याठिकाणी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रिया राठोड, डॉ. हंसिया पिल्लई यांनी महिलेच्या रक्ततपासण्या, सोनोग्राफी केली. यात महिलेच्या पोटात ७ सेंमी, ४ सेंमी आणि ३ सेंमी अशा तीन गाठी असल्याचे निदान करण्यात आले. महिलेच्या गर्भपिशवी मोठी झाल्याने पोटाचाही आकार वाढला. चार महिन्यांच्या गर्भवतीप्रमाणे महिलेचे पोट झाले होते.

अशा परीस्थितीत महिलेवर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महिलेवर कुठलीही चिरा न मारता बिनटाक्यांची शस्त्रक्रिया करून तीच्या पोटातील तीन गाठी काढण्यात आल्या. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रिया राठोड यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. हंसिया पिल्लई यांनी केलेल्या शस्त्रक्रियेमुळे महिलेचे प्राण वाचले.



प्रसूतीनंतर शरीरातील बदलांमुळे गाठींची समस्या होते. या गाठींमुळे पोटात प्रचंड वेदना होतात. वेळीच या गाठींचे निदान होणे आवश्यक असते. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात भरती झालेल्या महिलेच्या पोटात तीन गाठी होत्या. तसेच रक्तस्त्राव अधिकचा झाल्याने चिरा मारून शस्त्रक्रिया करणे धोक्याचे होते. त्यामुळे बिनटाक्याची शस्त्रक्रिया करून महिलेच्या योनीमार्गातून ह्या गाठी काढण्यात टीमला यश आले आणि महिलेचा जीव वाचला.
– डॉ. हंसिया पिल्लई, निवासी डॉक्टर

# मुका मार लागलेल्या कानावर दुर्लक्ष करणे ठरले गंभीर

## डॉ.उल्हास पाटील रूग्णालयातील इएनटी तज्ज्ञांकडून यशस्वी उपचार

**जळगाव – कानाला मुका मार लागलेल्याकडे दुर्लक्ष करणे कल्याण येथील रूग्णाला महागात पडले. कानावर सूज येऊन आतून कान सडत होता. वेळीच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील कान-नाक-घसा तज्ज्ञांनी यशस्वी उपचार केल्याने रूग्ण पूर्णपणे बरा झाला.**



४५ वर्षीय सुदाम पाटील या रूग्णाच्या कानाला दुखापत झाली होती. या दुखापतीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांच्या कानावर सूज आली आणि आतून कान सडण्यास सुरूवात झाली होती. कल्याण येथून आलेल्या या रूग्णाने थेट डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील नाक-कान-घसा तज्ज्ञांची भेट घेतली. याठिकाणी विभागप्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल यांनी त्यांची तपासणी केली असता पॅरीकॉन्ड्रायटीस असल्याचे निदान करण्यात आले. निदानानंतर त्यांच्यावर इंजेक्शन आणि ड्रेसींगद्वारे उपचार करण्यात आले. या उपचारामुळे त्यांचा कान बचावला. या उपचारासाठी डॉ. सृष्टी, डॉ. पंकजा बेंडाळे, डॉ. जान्हवी, डॉ.बासू, डॉ. अंकीता यांनी सहकार्य केले.

# कावीळवरील उपचारामुळे वाचले नवजात शिशुचे प्राण

**जळगाव – यावल तालुक्यातील हरीपूर येथे जन्मलेल्या शिशुला उच्च पातळीचा कावीळ झाला होता. या शिशुवर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या नवजात शिशु विभागाने फोटोथेरेपीद्वारे केलेल्या उपचाराला यश मिळाल्याने त्याचे प्राण वाचले.**

याबाबत माहिती अशी की, यावल तालुक्यातील हरीपूर येथील इतबार तडवी यांच्या पत्नीची प्रसूती झाल्यानंतर जन्मलेल्या शिशुला कावीळ झाला होता. शिशुचे संपूर्ण शरीर हे पिवळे पडले होते. अशा परिस्थितीत शिशुला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या नवजात शिशु अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

याठिकाणी नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीवार यांनी शिशुची तपासणी करून तातडीने उपचार सुरू केले. शिशुच्या कावीळचे प्रमाण १८.७५ इतके प्रचंड वाढल्याने त्याच्यावर फोटोथेरेपी करण्यात आली. फोटोथेरेपीमुळे अवघ्या तीन ते चार दिवसात कावीळचे प्रमाण कमी झाले आणि शिशुचे प्राण वाचले. उपचारासाठी डॉ. उमाकांत अणेकर, डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे, हिरामण लांडगे यांनी सहकार्य केले.

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात फोटोथेरेपीने यशस्वी उपचार



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे.

नवजात शिशुचे कावीळमुळे शरीर पिवळे पडते. अशा वेळी तज्ज्ञ डॉक्टरांकडून त्याच्यावर उपचार होणे आवश्यक असते. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात भरती झालेल्या शिशुच्या कावीळचे प्रमाण अतिउच्च पातळीवर होते. त्यामुळे त्याच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. मात्र डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचारामुळे शिशुचे प्राण वाचविण्यात टीमला यश आले.



–डॉ. सुयोग तन्नीरवार
निवासी डॉक्टर

## संपादकीय

# मन करा प्रसन्न

जागतिक मानसिक आरोग्य दिवस' सर्वत्र नुकताच साजरा झाला. अनेकदा शारीरिक अस्वास्थ्य आणि मानसिक अस्वस्थता यांचा जवळचा संबंध असतो. त्याची जाणीव मोजक्या लोकांना का होईना पण होऊ लागली आहे. मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी नात्यांत परस्पर संवादाची नितांत आवश्यकता असल्याचे डॉ. आनंद नाडकर्णी यांनी एका कार्यक्रमात सांगितले. मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी संवाद अनमोल आहेच. नातेसंबंधांचा तो भक्कम पाया आहे. परस्पर संवाद वातावरण मोकळे आणि सकारात्मक होण्यास मदत करू शकतो. संवादातून माणसे कुटुंबातील सदस्यांकडे मन मोकळे करू शकतात. समस्या नेमकेपणाने मांडू शकतात. मात्र, त्यासाठी कोणीतरी एकाने पुढाकार घेणे गरजेचे असते. संवाद टिकवून ठेवण्यासाठी प्रसंगी माघार घेणे, तडजोड करणे, समोरच्या व्यक्तीला समजून घेणे किंवा समजावून सांगणे असे प्रयत्न आवश्यक असतात. निदान कुटुंबातील सदस्यांची तशी मानसिक तयारी असायला हवी तरच संवादाचा पूल उभा राहू शकतो. कुटुंबातील सदस्यांना तो आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळ्याच्या धाग्यांनी बांधून ठेवू शकतो. साहचर्य निर्माण करू शकतो. प्रसंगी एक पाऊल पुढे टाकण्याची किंवा मागे घेण्याची तयारी किती सदस्य दाखवतात यावरच संवादाचे आणि म्हणजेच मानसिक आरोग्याचे भवितव्य अवलंबून असते. डॉ. नाडकर्णी तेच सुचवू इच्छित असावेत. मानसिक आरोग्य बिघडू शकते आणि माणसे मनाने आजारी पडू शकतात याचा स्वीकार माणसे करू शकतात का? हा महत्वाचा मुद्दा आहे. अनेकदा काही जण ती अस्वस्थता व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. तथापि 'सगळे काही व्यवस्थित सुरु आहे, भरल्या घरात कसला आला आहे प्रश्न? नसते लाड दुसरे काय?' अशीच संभावना होताना दिसते. मानसिक आरोग्यावर जनजागृती करण्यासाठी निरंतर प्रयत्न सुरु आहेत. निराशा, अतिचंचलता, क्रोध, अस्वस्थता, भावनिक चढ-उतार यावर मोकळेपणाने काही माणसे व्यक्त होतात. त्यात प्रसिद्ध व्यक्तींचाही समावेश आहे.तथापि सर्वसामान्य माणसांच्या पातळीवर त्याचा स्वीकार क्वचितच का होत असेल? विविध कारणांमुळे सामान्य माणसेही मानसिकदृष्ट्या आजारी पडू शकतात. हे वास्तव मान्य होत नाही तोपर्यंत त्यावर उपाय योजणे आणि ते अंमलात आणणे ही फार दूरची गोष्ट ठरेल. त्यासाठी प्रयत्न सुरु राहणे आवश्यक आहे. मन सुदृढ होण्यासाठी त्याला प्रसन्न ठेवायला हवे.

# वाचन प्रेरणा दिन

भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाइल मॅन तसेच शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम यांना विधानसभेत श्रद्धांजली अर्पण करून १५ ऑक्टोबर




हा त्यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती आहे देशाच्या युवा पिढीला वाचनाची आवड लागावी यासाठीच या दिनाची सुरुवात करण्यात आली आहे. युवा पिढीला वाचनाची आवड ही शाळा महाविद्यालयीन दशेतच निर्माण केली जाऊ शकते. त्यासाठी ग्रंथालयाचा वाटा खूप मोठा आहे.विद्यार्थ्यांनी पुस्तके तसेच इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीने वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन केले जाते.यामागचा उद्देश हाच की वाचन संस्कृतीला अधिकाधिक बळकट करण्यात यावे.

डॉ. कलाम यांच्या विचारांनी आणि कर्तुत्वाने युवा पिढीला भारावून टाकले त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमध्ये युवाशक्ती विषयी तसेच पुढे भारत कसा महासत्ता होईल हे सांगितले आहे. त्यांचे लेखन हे खूपच स्फूर्तीदायी आहे. प्रत्येक पिढीनेच त्यांचे साहित्य वाचावे असेच बहुमोल साहित्य त्यांचे आहे.वाचन प्रेरणा दिन हा शाळा महाविद्यालयासोबतच विविध कार्यालये,बँका व इतर ठिकाणी आयोजित करून सर्वांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. हीच खरी डॉ.कलाम यांना श्रद्धांजली असेल असे मला वाटते.

**सौ. कविता राहुल भोरटके**
**ग्रंथपाल**
**डॉ.वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स.**



# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हेल्थ रन २०२४ मध्ये गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचे यश

## ✻ ३ कि.मी. स्पर्धेत प्रा अभिजित राठोड व्दीतीय,
## ✻ बीएस्सीचा भिसन बारेला पाचवा

जळगाव: महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आयोजित हेल्थ रन २०२४ मध्ये गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्रा. अभिजित राठोड आणि बी.एस्सी. (नर्सिंग) पाचव्या सत्राचे विद्यार्थी भिसन बारेला यांनी यश मिळवले आहे. या स्पर्धेचा उद्देश समाजात सुदृढ आरोग्यासाठी चालणे आणि धावण्याचे महत्त्व पटवून देण्याचा होता.या हेल्थ रनमध्ये गोदावरी नर्सिंगचे ३० विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते. ३ कि.मी. शर्यतीत प्रा. अभिजित राठोड यांनी द्वितीय क्रमांक पटकावत रु. ८०००/- रोख रक्कम, प्रमाणपत्र व पदक मिळवले. त्याचबरोबर, बी.एस्सी. नर्सिंग पाचव्या सत्रात शिकणारा विद्यार्थी भिसन बारेला याने पाचवा क्रमांक मिळवून रु. ५०००/- रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि पदक प्राप्त केले.या विजेत्यांचा सत्कार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट कर्नल माधुरी कानिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. या हेल्थ रनमध्ये महाराष्ट्रातील विविध आरोग्य विज्ञान महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. त्यांच्या या यशाबद्दल गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये जल्लोष व्यक्त करण्यात येत असून विजेत्या स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ.केतकीताई पाटील,डी एम कॉर्डीओलॉजी डॉ.वैभव पाटील, प्राचार्य विशाखा गणविर यांनी अभिनंदन केले आहे.




# विविध ठिकाणच्या शिबिरात शेकडो दात्यांचे रक्तदान

**जळगाव – १ ऑक्टोबर..ऐच्छिक रक्तदाता दिन व १ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त.. गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न**




५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान.. उपस्थित मान्यवर गोदावरी फाउंडेशन अध्यक्ष..डॉ.उल्हास पाटील सर, डॉ वर्षा पाटील मॅम., डॉ.डी.बी.पाटील सर (संचालक), डॉ आर के मिश्रा सर (प्राचार्य), डॉ. पंकज शर्मा सर (प्राध्यापक), डॉ. अमोल चोपडे सर (वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी), डॉ. श्वेता डांगरे (वैद्यकीय अधिकारी), डॉ. कुणाल फेगडे (वैद्यकीय अधिकारी), विद्यार्थी – प्रवीण राजळे, श्रद्धा पाटील, वंशिका बन्सल, दिव्या थोरात, रक्तपेढीचे डॉ.सौ. प्रज्ञा मॅडम, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील. टेक्निशियन सय्यद शेख., राज तवर, भावेश शेळके यांनी घेतले परिश्रम,,



## इंग्लिश मेडीयम स्कूल सावदा

गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल सावदा तालुका रावेर येथे इंग्लिश मिडीयम च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन.. यात ३१ रक्तदात्यांनी केले रक्तदान उपस्थित प्राचार्य. डॉ. सौ. भारती महाजन मॅडम.. रक्तपेढीचे..डॉ.समीर सर, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन.सैयद शेख, भावेश शेळके,यांनी घेतले परिश्रम..



## सार्वजनिक गणेश उत्सव

सार्वजनिक गणेश उत्सव २०२४ आयोजित. यांच्या संयुक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबिर सपन्न..४१ रक्तदात्यांनी ६ शिवमुद्रा प्रतिष्ठान व शिवमुद्रा ढोल पथक व गणेश भक्तयांनी केले रक्तदान..अध्यक्ष..वासु इंगळे,कुणालभाऊ इंगळे, कौस्तुभ लॅब चे संचालक. रितेश वारके, प्रफुल्ल वारके,प्रीती वारके, मंगेश पाटील गोदावरी रक्तपेढीचे डॉ. शुभम सर रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, सईद शेख, यश पाटील,भावेश शेळके यांनी घेतले प्रश्रिश्रम



## डॉ. उल्हास पाटील फिजोथेरपी कॉलेज

गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील फिजोथेरपी कॉलेज आयोजित.. जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.. यात ४१ रक्तदात्यांनी केले रक्तदान उपस्थित गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील सर, प्राचार्य. डॉ. जयवंत नागुलकर सर, रजिस्टर राहुल गिरी,रक्तपेढीचे..डॉ.नितीन भारंबे सर, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन.सैयद शेख,राज तुवर,यश पाटील,भावेश शेळके,यांनी घेतले परिश्रम..



## तांदलवाडी ता. रावेर

भाजपचे युवा नेते नंदू भाऊ महाजन यांच्या तांदलवाडी ता. रावेर येथे.. ३५ रक्तदात्यांनी वाढदिवसानिमित्त केले रक्तदान..उपस्थित मान्यवर बेटी बचाव बेटी पढाव चे डॉ.राजेंद्र फडके. अशोक कांडेलकर, सुरेश धनके, साई सेवा समितीचे व महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील, प्रभाकर महाजन,डॉ. सौरभ सर.रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन.सैयद शेख, यश पाटील भावेश शेळके,यांनी घेतले परिश्रम




## जी. डी.बेंडाळे महिला महाविद्यालय

डॉ.अण्णासाहेब जी. डी.बेंडाळे महिला महाविद्यालय जळगांव विद्यार्थी विकास विभाग,राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी , ३१ रक्तदात्यांनी केले.

रक्तदान.. उपस्थित महाविद्यालयातील प्राचार्य मॅडम,शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वृंद, विद्यार्थी व रक्तदाते, गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील रक्तपेढीचे..डॉ.नितीन भारंबे सर, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन.सैयद शेख, भावेश शेळके,यांनी घेतले परिश्रम

## सुना सावखेडा, बामनोद

आदरणीय.श्री.प.पु.सद्गुरू जगतप्रकाश स्वामी.. यांच्या अवतरण दिनानिमित्त.. कष्ट भजन हनुमान मंदिर सुना सावखेडा बामनोद ता. यावल येथील भव्य रक्तदान शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते.. यात ५१.. रक्तदात्यांनी केले.

रक्तदान.. उपस्थित चेतन भगत,आमदार श्री.शिरिषदादा चौधरी,सरपंच राहुल तायडे, प्रा. राजेंद्र राणे सर, पिंटू राणे, कुणाल इंगळे, सर्व श्री.स्वामीनारायण मंदिर भाविक भक्त व रक्तदात्यांनी केले रक्तदान डॉ. उल्हास पाटील. रक्तपेढीचे..डॉ.नितीन भारंबे सर, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन.सैयद शेख, भावेश शेळके यांनी परिश्रम घेतले.



Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिद्ध करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये आंतरराष्ट्रीय बालिका दिवस उत्हासात

## भविष्यासाठी मुलीची दृष्टीवर मंथन

**जळगाव – येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये नुकताच आंतरराष्ट्रीय बालिका दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भविष्यासाठी मुलींची दुष्टी या वर्षीची थिम असून यावर विचारवंतांनी मार्गदर्शन केले.**

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य विशाखा गणविर, स्त्रीरोग विभाग प्रमुख मिनाव देवी, प्रा निम्मी वर्गीस,प्रा.जयश्री जाधव,प्रा स्नेहल जांभोळकर इ उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. भविष्यासाठी मुलीची दृष्टी या



विषयावर आधारीत पोस्टरचे अनावरण करण्यात आले. २०२४ च्या आंतरराष्ट्रीय बालिका दिनाची थीम गर्ल्स व्हिजन फॉर द फ्युचर आहे. युनिसेफने केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की मुली, अनेक आव्हानांना तोंड देत असूनही, एक चांगले भविष्य घडवण्यासाठी आशावादी आणि दृढनिश्चयी राहतात. दररोज, जगभरातील मुली एका दृष्टीच्या दिशेने काम करत आहेत ज्यामध्ये त्यांना संरक्षित, आदर आणि सशक्त केले जाते. जेव्हा मुलींना योग्य संसाधने आणि संधींचे समर्थन केले जाते, तेव्हा त्यांची क्षमता अमर्याद असते. आणि जेव्हा ते नेतृत्व करतात तेव्हा सकारात्मक प्रभाव त्यांच्या कुटुंबावर, समुदायांवर आणि अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचतो असे प्रा मिनावदेवी यांनी सांगितले यांनिमीत्ताने घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती..

जी एन एम व बीएस्सी नर्सिगच्या १९ स्पर्धकांनी सहभाग घेतला यात प्रथम विजेता लोकेश्वरी सोनार जीएन एम प्रथमवर्ष, व्दीतीय सानिका महल्ले बी एस्सी चतुर्थ सत्र आणि तृतीय रूचिता वंजारी जीएन एम प्रथम वर्ष परिक्षक म्हणून प्रा हेमांगी मुरकुटे, प्रा. समृध्दी चव्हाण यांनी काम पाहीले,या निमीत्ताने भविष्यासाठी मुलीची दृष्टीवर नाटीका देखिल प्रस्तुत करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा. वैष्णवी शहाणे यांनी केले यशस्वीतेसाठी स्त्रीरोग विभागाच्या प्राध्यापक, कर्मचा–यांनी परिश्रम घेतले.



## डॉ. प्रेमचंद पंडित
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)

प्रेमवाणी

डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. *Align quality goals with individual performance accountabilities.*
– ❋गुणवत्ता लक्ष्यों को व्यक्तिगत प्रदर्शन जवाबदेहियों के साथ संरेखित करें।❋
2. *Plan amid change - driven by constant monitoring of success.*
– ❋परिवर्तन के बीच योजना बनाएं – सफलता की निरंतर निगरानी से प्रेरित।❋
3. *Define your unique value proposition.*
– ❋अपनी अद्वितीय मूल्य प्रस्ताव को परिभाषित करें।❋

# जागतिक अन्न दिवस साजरा

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालयात जागतिक अन्न दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रात्यक्षिकातून अन्न दिवसाचे महत्व विषद करण्यात आले.**

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ एस एम पाटील परिसर संचालक अध्यक्ष डॉ अशोक चौधरी, डॉ शैलेश तायडे, प्राचार्य, कृषि महाविद्यालय डॉ पी आर सपकाळे, प्राचार्य, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, अतुल बोंडे, सहायक कुलसचिव यांची उपस्थिती होती. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी रागी बिस्कीट, चॉकलेट क्रीम रोल , लादी पाव, ब्रेड, खारी, टोस्ट इ. बेकरी पदार्थ बनवून विक्री केले. डॉ एस एम पाटील यांनी जागतिक अन्न दिवसाचे महत्व सांगितले. डॉ अशोक चौधरी यांनी अंतिम वर्षाचे विद्यार्थी सगळे पदार्थ स्वतः तयार करायला शिकतात




व स्स्वतः उद्योग सुरू करू शकण्याची क्षमता निर्माण करतात याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले.सूत्रसंचालन कार्तिक रावने तर प्रा. मोहित बनपूरकर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सारिका पाटील, दीपक काशीकर, प्रशांत कोळी, सचिन पाटील या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईटतर्फे ‘हँड वॉशिंग डे’ साजरा

**जळगाव – या वर्षीच्या जागतिक हात धुवा दिवसाची थीम, स्वच्छ हात अजूनही महत्वाचे का आहेत? संसर्ग रोखण्यासाठी हाताच्या स्वच्छतेची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट तर्फे आयोजित हँड वॉशिंग डे चे आयोजन करण्यात आले होते,**

हात धुण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक स्तरावर हात धुवा दिवस साजरा केला जातो. व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके यांनी गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल केजी वन च्या चिमुकल्यानचे हात धुण्याची योग्य पध्दत कृतीतून दाखवत कार्यक्रमाची सुरूवात केली. यानंतर बोलतांना ग्लोबल हँडवॉशिंग




उद्रेक आणि साथीच्या रोगांपासून बचाव करण्यासाठी स्वच्छ हातांचे महत्त्व अधोरेखित करतो, विशेषत: आरोग्य सेवेपर्यंत मर्यादित प्रवेश असलेल्या भागात. हात धुण्यास प्रोत्साहन देऊन, हा दिवस एकूण आरोग्य परिणाम सुधारण्यात आणि प्रतिबंध करण्यायोग्य मृत्यू कमी करण्यात योगदान देतो, त्यानंतर चिमुकल्याना कप केक चे वाटप करण्यात आले. रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट चे समन्वयक प्रा. प्राजक्ता पाटील आणि प्रदन्या बाविस्कर यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा यांनी परिश्रम घेतले.

# रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईटतर्फे ‘हँड वॉशिंग डे’ साजरा

**जळगाव – रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईट तर्फे आयोजित हँड वॉशिंग डे चे आयोजन करण्यात आले होते, गोदावरी स्कुल व औद्योगिक वसाहत परिसरामधील लहान मुलांमध्ये ग्लोबल हँडवॉशिंग डे हा हात स्वच्छतेच्या महत्त्व विषद केले.**

यावेळी प्राचार्य डॉ. निलीमा वारके यांनी लहान मुलांना एकत्रित हात धुण्यास तसेच हँन्डवॉश करण्याची योग्य पध्दत विषद केली. पुढे बोलतांना त्यांनी हा एक आंतरराष्ट्रीय उत्सव आहे. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, यामागे हात धुणे रोगांपासून बचाव आणि जीव वाचवण्याच्या भूमिकेबद्दल जागरुकता वाढवण्याचा उद्देश आहे. हा दिवस एक स्मरण करून देतो की साबणाने नियमित हात धुणे हा अतिसार आणि श्वसन संक्रमण यांसारख्या आजारांपासून




बचाव करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे, विशेषत: मुलांमध्ये. हे सरकार, शाळा आणि समुदायांना स्वच्छता आणि स्वच्छतेची संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहित करते असे सांगितले.त्यानंतर चिमुकल्याना कप केक चे वाटप करण्यात आले. रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईट चे समन्वयक प्रा. प्राजक्ता पाटील आणि प्रदन्या बाविस्कर यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयात करिअर गाईडन्सवर मार्गदर्शन

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयात नुकतेच करीअर गाईडन्सवर मार्गदर्शन करण्यात आले.**

डॉ उल्हास पाटील विधी महाविद्यालयात प्रमुख अतिथी भुषण काळे साहेब (प्रथम वर्ग दिवाणी न्यायाधीश, जामनेर) यांनी करिअर गाईडन्स यात विधी क्षेत्रातील विविध संधी या विषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. विधी क्षेत्र हे अतिशय व्यापक असून त्यात विद्यार्थी आपले करिअर कसे घडवू शकतो असे साहेबांनी विस्तृतपणे सांगितले. तसेच विधी क्षेत्रात उत्तम संधी उपलब्ध असून याचा विद्यार्थ्यांनी करिअर म्हणून जरूर विचार करावा असे काळेंनी आवाहन केले..प्राचार्य डॉ नयना महाजन (झोपे ) यांनी शाल व श्रीफळ देऊन माननीय काळे यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲडवोकेट रवींद्र सिंग पाटील यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.





### डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयात

# ताणतणाव व कॉपीमुक्त परीक्षा अभियान

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील महाविद्यालय जळगाव येथे विद्यार्थ्यांसाठी ताण तणाव मुक्त व कॉपीमुक्त परीक्षा अभियान आयोजित करण्यात आले.यातून विद्यार्थ्यांना परिक्षा व मुल्यमापन तसेच आचारसंहीतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक एडवोकेट पूजा व्यास यांनी केले. डॉ. नयना महाजन यांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कडून दिवाळी २०२४ परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता तसेच विद्यार्थ्यांना वेळेचे व अभ्यासाचे नियोजन करावयाचे सांगून स्वतःची काळजी घेण्याचा सल्ला दिला. परीक्षेचा ताण कसा कमी करता येईल यावरही मार्गदर्शन केले. पुढे




बोलतांनी विद्यार्थ्यांनी मागच्या वर्षाच्या जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून कसा ताण कमी करावा परीक्षेचे गैरप्रकार व त्यासाठी असलेल्या शिक्षेचे स्वरूपही विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांनी परीक्षा गैरप्रकार व त्याच्या दुष्परिणामांची जाणीव ठेवावी आणि परीक्षा प्रामाणिकपणे द्यावी यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ऐश्वर्या आठवले यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी व सर्व एलएलबी आणि बीए एलएलबी चे विद्यार्थी उपस्थित होते.

## तज्ञांकडून जाणून घ्या मधुमेहाचे प्रकार व लक्षणे

**मधुमेहाचे तीन प्रकार पडतात – १ मधुमेह, प्रकार २ मधुमेह, गर्भधारणेमुळे होणारा मधुमेह.**

**प्रकार– १ मधुमेह –** सामान्यतः या आजाराची सुरुवात बालपणापासून किवा तरुण वयामध्ये होते. हया आजाराची सुरुवात अचानक पणे होऊन रुग्णांस जीवंत राहण्यांस इन्सुलिन ची आवश्यकता असते. शरीरातील स्वादुपिंडाच्या पेशीचे स्वयंरित्या नाश होऊन हा आजार होतो.


**मधुमेह प्रकार – २ मधुमेह –** या आजाराला इन्सुलिनवर अवलंबून नसलेला मधुमेह किंवा प्रौढ लोकांत होणारा मधुमेह असे म्हणतात. सामान्यतः या आजाराचे रुग्ण शारिरीक व्यायाम व आहाराच्या मदतीने या आजारावर नियंत्रण ठेवू शकतात. परंतु काही काळाने रुग्णांना औषधांची आणि इन्सुलिनची आवश्यकता असते. या रुग्णांमध्ये सामान्यत कौटुंबिक इतिहास आढळतो.

**गर्भधारणेमुळे होणारा मधुमेह –** या आजारात गर्भधारणेच्या काळात शरीरात साखरेचे प्रमाण वाढते. सामान्यतः गर्भधारणेनंतर हा आजार बरा होतो. परंतु यामुळे माता व बालक या दोघांना भविष्यात प्रकार–२ मधुमेह होण्याची संभावना असते.

# पोटातील अल्सरकडे दुर्लक्ष करू नका

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा घ्या सल्ला

**जळगाव – आम्लता जास्त झाल्याने किंवा जठराची आम्ल सहन करण्याची शक्ती कमी झाल्याने हळूहळू जठरव्रण तयार होतो. अल्सर किंवा जठरव्रण हे मध्यमवयात बऱ्याच लोकांमध्ये आढळणारे दुखणे आहे. असे दुखणे जाणवल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.**



सतत काळजी,ताण, गडबड, जेवणातील अनियमितता, तिखट,तेलकट आहार यांच्यामुळे आम्लता वाढून अल्सर होण्याची शक्यता असते. हा आजारही आता जिवाणूंमुळे (हेलिकोबॅक्टर) होतो असे सिध्द झाले आहे. पुरुषांमध्ये याचे प्रमाण जास्त असते.जेवणानंतर तास–दोन तासांनी पोटातले दुखणे वाढत असल्यास जठराऐवजी त्यापुढच्या लहान आतडयांच्या भागात (आमाशय) आतडे व्रण असण्याची शक्यता असते. भारतात जठरव्रणापेक्षा हा प्रकार जास्त आढळतो. वारंवार दुखणे हे अल्सरचे निदर्शक आहे. जेवणानंतर हे दुखणे वाढते किंवा कमी होते. तसेच तेलकट, तिखट खाल्ल्याने ते वाढते असे रुग्णाच्या लक्षात आल्यावर त्याच्या जेवणात आपोआप बदल घडून येतो. व्रणातून काही वेळा अचानक रक्तस्राव चालू होतो. अशा वेळी रक्ताची किंवा लालसर रक्तमिश्रित उलटी होते. पचनमार्गात बारीक रक्तस्राव कायम चालू राहिल्यास विष्ठेचा रंग काळसर दिसतो. क्वचित जठरव्रणाच्या जागी भोक पडून जठरातले पदार्थ, आम्ल पोटात (उदरपोकळीत) सगळीकडे पसरतात. यामुळे एकदम गंभीर परिस्थिती (उदरसूज) निर्माण होते. यापैकी कुठल्याही प्रकारची लक्षणे आढळून आल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# डोळ्यातील तिरळेपणावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपचार उपलब्ध

**जळगाव – तिरळेपणा हे प्रामुख्याने डोळ्यातील जन्मजात दोष असतो याशिवाय अपुरी दृष्टी किंवा डोळ्याच्या बाहेरील स्नायूमध्ये सैलपणा आल्यामुळे डोळ्यात तिरळेपणा होत असतो. तिरळेपणा ह्या डोळ्याच्या आजारास क्रॉस आइज असेही म्हणतात. या तिरळेपणावर उपचार करण्यासाठी आजच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.**




तिरळेपणा हा एका किंवा दोन्ही डोळ्यांतही असू शकतो. तिरळेपणात डोळ्यातील बुबुळं एका सरळ रेषेत नसतात. काहीवेळा डोळा नाकाच्या बाजूस वळलेला असतो या प्रकारास इसोट्रोपीया असे म्हणतात. तर डोळा कानाच्या बाजूस वळलेला असल्यास त्या प्रकारास एक्सोट्रोपीया असे म्हणतात. आनुवंशिकता म्हणजे कुटुंबामध्ये आई–वडील यांना तिरळेपणा असल्यामुळे,डोळ्यांमधील जन्मजात दोषामुळे, डोळ्याच्या स्नायूंमधील कमजोरी असल्याने, याशिवाय रेटिनाचे विविध आजार, चष्म्याचा मोठा नंबर असणे यांमुळेही तिरळेपणाची समस्या निर्माण होऊ शकते.लहान वयामध्येचं तिरळेपणावर योग्य उपचार केल्यास हा दोष सहज दूर होऊ शकतो. मात्र जसजसे वय वाढत जाते, तसतसे तिरळेपणावर उपचार करूनदेखील नजर सरळ करणे अवघड असते. यासाठी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हभप जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयात त्वरीत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पित्ताशयातील खड्यांचे वेळीच निदान करा

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात खात्रीशीर उपचार

**जळगाव – अनेक लोकांना पित्ताशयात खडे होण्याचा त्रास असतो. आपल्या शरीरात उजव्या कुशीत यकृताच्या खाली पित्ताशयाची पिशवी असते. या पित्ताशयात पित्त साठवले जाते. या पित्ताचा उपयोग पचनक्रियेसाठी होत असतो. पित्ताशयात काहीवेळा पित्ताचे खडे धरत असतात. विशेषतः पित्ताशयातील पित्तामध्ये कोलेस्टेरॉलचे प्रमाण अधिक झाल्यास पित्ताचे खडे होत असतात. पुरुषांपेक्षा महिलांमध्ये हा त्रास जास्त प्रमाणात आढळतो. पित्ताशयातील खड्यांचे वेळीच निदान करण्यासाठी आणि खात्रीशीर उपचारासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात सुविधा उपलब्ध आहे.**



पित्ताशयातील पित्तामध्ये रासायनिक असंतुलनामुळे पित्ताचे खडे होत असतात. पित्ताशयातील पित्तामध्ये कोलेस्टेरॉल, कॅल्शियम ग्लायकोकॉलेट आणि बिलीरुबिनचे प्रमाण अधिक झाल्यास पित्ताचे खडे होतात.

पित्ताशयात होणारे जवळपास ८० टक्के पित्ताचे खडे हे कोलेस्ट्रॉलपासून बनलेले असतात. तर २० टक्के पित्ताचे खडे कॅल्शियम ग्लायकोकॉलेट आणि बिलीरुबिनपासून बनलेले असतात.

### पित्ताशयात खडे झाल्याची लक्षणे

पित्ताशयात खडे असले तरीही बऱ्याच लोकांना काहीवेळा याची लक्षणे जाणवत नाहीत. या त्रासात साधारणपणे खालील लक्षणे जाणवू शकतात.पित्ताशयातील खड्यांमुळे पित्ताशयाला सूज येऊन उजव्या कुशीत दुखणे, पोटदुखी, जेवणानंतर त्रास वाढलेला जाणवतो, ताप येणे, मळमळणे, उलटी होणे, काविळ होणे, लघवीला गडद होणे, शौचाचा रंग पांढरट किंवा मातकट असणे, घाम येणे, पोट गच्च वाटणे व ढेकर येणे अशी लक्षणे या त्रासात जाणवू शकतात.

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात निदान व उपचार

**रुग्णातील लक्षणे पाहून व शारीरिक तपासणी करून आपले डॉक्टर या त्रासाचे निदान करू शकतात. निदान स्पष्ट होण्यासाठी काही चाचण्या व तपासण्या कराव्या लागू शकतात. पित्ताशयात खडे आहेत की नाही हे पाहण्यासाठी अल्ट्रासाऊंड, सीटी स्कॅन, एक्स–रे किंवा रेडिओनुक्लाइड स्कॅन करून आजाराचे निदान व योग्य तो उपचार डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात केला जातो.**


# टॉन्सिल सूज कारणाबद्दल जाणून घ्या!

**टॉन्सिलची सूज, ज्याला वैद्यकीय भाषेत टॉन्सिलिटिस म्हणतात, जागतिक स्तरावर अनेक व्यक्तींना प्रभावित करते. या सामान्य आजाराची स्पष्ट समज देण्यासाठी टॉन्सिल्स सुजलेल्या टॉन्सिलची कारणाबददल आमच्या तज्ञांकडून जाणून घ्या.**

टॉन्सिल हे घशाच्या मागील बाजूस स्थित लिम्फॉइड ऊतक असतात. तोंडातून आणि नाकातून आत प्रवेश करणाऱ्या रोगजनकांना अडकवून ते रोगप्रतिकारक शक्तीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तथापि, अनेक कारणांमुळे या ऊतींना सूज येऊ शकते, ज्यामुळे अस्वस्थता आणि इतर लक्षणे दिसून येतात.

टॉन्सिल सूज कारणे व्हायरल इन्फेक्शन्स टॉन्सिल सूज होण्याचे सर्वात सामान्य कारणांपैकी एक म्हणजे व्हायरल इन्फेक्शन, उदा सामान्य सर्दी: राइनो व्हायरसमुळे टॉन्सिलचा सौम्य दाह होऊ शकतो. **इन्फ्लूएंझा:** फ्लू विषाणूमुळे लक्षणीय सूज आणि वेदना होऊ शकतात.

**एपस्टाईन–बॅर व्हायरस :** हा विषाणू संसर्गजन्य मोनोन्यूक्लिओसिसला कारणीभूत ठरतो, ज्यामुळे अनेकदा टॉन्सिल वाढतात.



जिवाणू संक्रमण जिवाणू संसर्ग, जरी व्हायरल पेक्षा कमी सामान्य असले तरी, टॉन्सिल सूज देखील होऊ शकते: **स्ट्रेप्टोकोकस पायोजेनेस:** या जीवाणूमुळे स्ट्रेप घसा होतो, ज्याचे वैशिष्ट्य तीव्र सूज आणि वेदना असते.डिप्थीरिया: एक दुर्मिळ परंतु गंभीर जिवाणू संसर्ग ज्यामुळे टॉन्सिलचा व्यापक दाह होऊ शकतो. संक्रमणाव्यतिरिक्त, इतर घटक टॉन्सिलच्या सूजमध्ये योगदान देऊ शकतात.

**ऍलर्जी:** परागकण, धूळ आणि इतर ऍलर्जींवरील ऍलर्जीमुळे सौम्य टॉन्सिल वाढू शकतात.टॉन्सिल स्टोन्स: टॉन्सिलर क्रिप्ट्समध्ये कचरा जमा झाल्यामुळे सूज आणि अस्वस्थता होऊ शकते.चिडचिड करणारे: धूर, प्रदूषण किंवा कठोर रसायनांचा संपर्क टॉन्सिलला त्रास देऊ शकतो, ज्यामुळे ते फुगतात टॉन्सीलवर औषधी उपलब्ध असून आवश्यकता भासल्यास तज्ञांच्या सल्ल्याने शस्त्रक्रिया करावी.

–डॉ सायकेत बासू
कान नाक घसा तज्ञ

# उच्च न्यायालय आणि खंडपीठात विशेष लोकअदालतीचे आयोजन

**जळगाव – उच्च न्यायालयातील प्रलंबीत खटले निकाली काढण्यासाठी उच्च मुंबई आणि त्यांचे खंडपीठ नागपुर व औरंगाबाद येथे ३० नोव्हेंबर, २०२४ आणि १ डिसेंबर, २०२४ या कालावधीत विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री. एस.पी. सैय्यद सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जळगाव यांनी दिली आहे.**



जळगाव जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे उच्च न्यायालयातील प्रलंबीत आहेत व ही प्रकरणे तडजोडीने मिटावीत अशी ज्यांची इच्छा आहे. अशा पक्षकारांची प्रकरणे या विशेष लोकअदालतीत ठेवता येणार आहे. त्यासाठी श्री. एम.क्यु. एस, एम शेख अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्व बोलणी बैठक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्व बोलणी बैठक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव येथे घेण्यात येणार आहे. संबधीत पक्षकार प्रत्यक्ष अथवा आभासी पध्दतीने यात सहभागी होउ शकतात. तरी अशा पक्षकारांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव या ठिकाणी संपर्क साधावा असे आवाहन एम.क्यु.एस, एम शेख अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# मोठ्या आवाजाचे फटाक वाजविण्यावर नियंत्रण ठेवून ध्वनी व हवा प्रदूषण टाळण्याचे आवाहन

**जळगाव – सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र. ७२/१९९८ दि.२७ सप्टेंबर, २००१ च्या अंतरिम आदेशानुसार दसरा, दिवाळी व इतर सणांच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी असे फटाके वाजविण्यास निर्बंध घालण्याबाबत आदेश दिलेले आहेत.**

केंद्र शासन, केंद्र शासित प्रदेश आणि राज्य शासन यांनी भारत सरकारच्या राजपत्र क्र. जीएसआर/६८२/ई दि. ५ ऑक्टोंबर, १९९९ नुसार प्रकाशीत केलेल्या पर्यावरण (संरक्षण) नियमातील तरतूदींचे मुख्यत्वे करुन व नियमातील सुधारित नियम ८९ ची, जे फटाकच्या आवाजाच्या मानांकाबाबत आहेत त्यांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

त्याबाबी खालीलप्रमाणे –एखादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मिटर अंतरापर्यंत १२५ डेसीबल आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्याचे उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे. जर साखळी फटाक्यात एकूण पन्नास, ते शंभर ते त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागे पासून ४ मिटर अंतरापर्यंत अनुक्रमे १५०,११० व १०५ डेसीबल एवढी असावी व त्यापेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या तसेच १०० पेक्षा जास्त फटाके असलेल्या सर्व साखळी फटाक्यांच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

फटाक्यांचे दारुकाम किंवा फटाके सायंकाळी ६ ते रात्री १० या कालावधी व्यतिरिक्त उडविण्यास परवानगी देण्यात येऊ नये. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजे पर्यंत दारुकाम व फटाके यांचा वापर करण्यात येऊ नये.

शांतता क्षेत्रामध्ये कोणत्याही फटाक्यांचा वापर कुठल्याही वेळेत करण्यात येऊ नये. शांतता क्षेत्रामध्ये रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये यांचे सभोवतालचे १०० मिटर पर्यंतचे क्षेत्र येते.

दिवाळी हा आनंदपर्व साजरा करतांना योग्य ती दक्षता जनतेने घेऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी पाचोरा भाग पाचोरा यांनी केले आहे.